# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### रत्नागिरी जिल्हयातीन आंबा बागायतदारांना निधी देण्याबाबत

**(१) ६१८२ (०७-०४-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील ५७ हजार ५३६ हेक्टर क्षेत्रावर बागायतदारांकडून आंबा पीक घेतले जात असून सन २०११-१२ मध्ये वातावरणातील बदल, थ्राप्स किडीचा प्रादुर्भाव यामुळे मोठ्या प्रमाणात आंबा पिकाचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) या नुकसानीच्या भरपाईसाठी तत्कालीन शासनाने ५१ कोटी रुपये दिले होते, त्यापैकी २१.९३ कोटी रुपयांच्या भरपाईचे वाटप करण्यात आले परंतु ३० कोटीचा निधी अखर्चित राहिल्याने हा निधी पुन्हा हा निधी शासनाकडे परत पाठविण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एवढया मोठ्या प्रमाणात निधी अखर्चित राहण्याची कारणे काय आहेत,

(४) उक्त निधी आपादग्रस्त आंबा बागायतदारांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) आंबा पिकाच्या नुकसानी भरपाईसाठी रू.५१.७७ कोटी निधी मंजूर करण्यात आला होता. त्यापैकी रू.२२१५.१२ लाख इतक्या निधीचे वाटप करण्यात आले असून उर्वरित निधी शासनास परत करण्यात आलेला आहे.

(३) व (४) जमिन मालकी हिस्सामध्ये सहहिस्सेदारांचे मोठे प्रमाण असणे, तसेच सहहिस्सेदार गावाबाहेर असणे. ७/१२ व बँक खाते क्रमांक उपलब्ध न झाल्यामुळे, मयत झालेल्या खातेदारांचे वारस तपास न झाल्यामुळे इत्यादी कारणांमुळे निधी अखर्चित राहीला.

जिल्हा परिषदेच्या संग्राम या नेटवर्कींगच्या माध्यमातून निधी वाटपाबाबत माहिती देण्यात आली. गणेशोत्सव, दिपावली, शिमगा या प्रमुख उत्सवांच्या वृत्तपत्राच्या माध्यमाद्वारे आवाहन करण्यात आले. स्थानिक पातळीवर ग्रामसभा, मेळावे व प्रत्यक्ष भेटी देऊन निधीबाबतची माहिती देण्यात आली.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेणसे (ता.पेण, जि.रायगड) परिसरातील रिलायन्स कंपनीच्या दुषित पाण्याची पाईप लाईन फुटून झालेले नुकसान**

**(२) ७६२५ (०९-०४-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेणसे (ता.पेण, जि.रायगड) या गावातील तुळसाबाई लक्ष्मण तरे या महिलेची शेती व तलावातील मच्छीचे नुकसान झालेबाबत संबंधीत शेतकरी महिलेने जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे नुकसान भरपाई मिळणेबाबत निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित महिलेला व परिसरातील शेतक-यांना रिलायन्स कंपनीच्या दुषित पाण्याची पाईप लाईन फुटल्याने झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याबाबत संबंधित कंपनीवर कार्यवाही करण्यात आली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

अर्जदार श्रीमती तरे यांचा मत्स्यतलाव हा रिलायन्स कंपनीच्या पाईपलाईनच्या बरच्या बाजूस उंचावर असल्यामुळे पाईपलाईनच्या गळतीमुळे मासे मृत होण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सदर तलावाचे पाणी उत्तम प्रतीचे आहे. तसेच सदर तलावाच्या क्षेत्रात कोणतेही पिक नाही. कंपनीने पाईपलाईन दूरूस्तीचे काम पूर्ण केलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पानशेत पूरग्रस्त वसाहतीतील जमिनीचा मालकी हक्क वाढीव बांधकाम नियमित करणे आणि वाढीव एफएसआय आदी प्रश्न ५४ वर्षानंतरही प्रलंबित असल्याबाबत**

**(३) ८२५२ (०४-०४-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लक्ष्मीनगर, महर्षिनगर, गोखलेनगर, दत्तवाडी, जनवाडी, शिवदर्शन, पर्वती दर्शन, हेल्थ कॅम्प, गणेशनगर, सेनादत्त पोलीस चौकी परिसरातील गोल घरे, सहकारनगर, सेनापती बापट

रस्त्यावरील काही सहकारी संस्था या पानशेत पूरग्रस्त वसाहतीतील जमिनीचा मालकी हक्क वाढीव बांधकाम नियमित करणे आणि वाढीव एफएसआय आदी प्रश्न ५४ वर्षानंतरही प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) राज्य सरकारकडून पूरग्रस्तांना घरे मालकी हक्काने करुन देण्याचा निर्णय घेताना म्हाडामार्फत पुनर्वसन केलेल्या घरांना आणि जिल्हाधिका-यांमार्फत पुनर्वसन केलेल्या कुटुंबांना वेगवेगळा न्याय लावल्याने अनेक पूरग्रस्त अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील १ व २ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०८-२०१६)** :(१) हे अंशत: खरे आहे.

पुणे शहर व त्यांच्या परिसरात पानशेत पूरग्रस्तांना पुनर्वसनासाठी बांधण्यात आलेले ३९८८ गाळ्यापैकी ३१४२ गाळे मालकी हक्काने करुन देण्यात आलेले आहे. ८४ गाळे विविध कारणास्तव मालकी हक्कावर करुन देता आले नाही. अद्यापही मालकी हक्कावर करण्यात न आलेल्या व सन १९९१ मध्ये तयार करण्यात आलेल्या यादीतील व सन १९११ मध्ये तयार करण्यात आलेल्या यादीतील ६७७ गाळेधारकांनाच त्यांचेकडून सन १९९१ सालची किंमत व त्यांवर प्राईम लेंडींग रेट (PLR) नुसार येणाऱ्या व्याजाच्या रकमेसह येणारी रक्कम वसुल करुन गाळे संबंधितांच्या नावावर करुन घेण्यास शासन निर्णय क्र.सीएलएल-०४/२०१३/प्र.क्र.७५/म-११, दिनांक २१.११.२०१३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**किन्हाळ, माकडी, पिंपळधारा आणि कोटेवाडा (ता.हिंगणा, जि.नागपूर)**
**येथील पुनर्वसित नागरिकांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(४) १४८४४ (०८-०४-२०१५). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किन्हाळ, माकडी, पिंपळधारा आणि कोटेवाडा (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील निम्न वेणा धरणातील थोप पाण्यामुळे सन २००४ मध्ये पुरग्रस्त म्हणून पुनर्वसन केल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्वसन क्षेत्रात करावयाची कामे अद्याप पूर्ण झाली नसल्याने ती कामे लवकरात लवकर करुन सदर पुनर्वसीत नागरीकांना त्याचा लाभ देण्याची मागणी दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुनर्वसीत नागरीकांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०९-२०१६)** :(१) होय.

(२) नाही.

(३) मौजा किन्हाळमाकडी, ता.नागपूर (ग्रा) येथील १४.९१ हे आर जागा मा, उपविभागीय अधिकारी, नागपूर तथा भूसंपादन अधिकारी, नागपूर यांचे दि. २९.५.२००८ च्या आदेशानुसार भूसंपादित करण्यात आली आहे. पुनर्वसन अभिन्यास नकाशा मंजूर करून त्यावर अभिन्यास टाकून १६३ भूखंड पाडण्यात आले. त्यापैकी १५७ भूखंड वाटप करुन ताबा देण्यात आला आहे. सद्य:स्थितीत तिथे कच्चा रस्ता, ट्रान्सफॉर्मर बसवलेला असून, विद्युत पुरवठा उपलब्ध आहे. पिण्याच्या पाण्यासाठी टाकी बांधलेली असून नळाच्या पाईप लाईनचे काम, विहीरीचे काम तसेच नवीन ग्रामपंचायत भवनाचे बांधकाम प्रगतिपथावर आहे. सांडपाणी जाण्याकरिता कच्च्या नाल्या तयार केलेल्या आहेत.

मौजा कोतेवाडा येथील १.७२ हे आर शेतजमीन प्रकल्पग्रस्तांसाठी संपादित करण्यात येऊन ५१ प्लॉट पाडण्यात आले आहेत. त्यापैकी ३९ प्लॉट वाटप करण्यात आले. परंतु लोकांनी ताबा घेतला नसून राहण्यासाठीही गेलेले नाहीत. नागरी सुविधांची कामे सुरू आहेत. मौजे पिंपळदरा या गावाचे पुनर्वसन सदर गावठाणलगतच करण्याचे नियोजित आहे. नागरी सुविधांची कामे सुरू आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे जिल्हयातील व जुन्नर परिसरात दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास अवकाळी पाऊस झाल्याबाबत

**(५) १४८९७ (१०-०४-२०१५). श्री.अजित पवार (बारामती), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व नाशिक जिल्हयातील परिसरात दिनांक १० फेब्रुवारी ते १ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास अवकाळी पाऊस झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अवकाळी पावसामुळे शेतक-यांचे द्राक्षे, डाळींब, ज्वारी, हरभरा, कांदा, गहू, आंबा व भाजीपाला पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शेती पिकांची पाहणी करुन पंचनामे तयार करण्यात आले आहेत काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुसार शेतक-यांना कोणत्या प्रकारची मदत करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०९-२०१६)** :(१) व (२) होय.

(३) व (४) होय. पुणे जिल्हयात माहे १० फेब्रुवारी, २०१५ ते १ मार्च, २०१५ या कालावधीत अवकाळी पावसामुळे जिरायत पिक, बागायती पिक व फळपिकाखालील बाधित एकूण ६३७५.६३ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले असून बाधित शेतकरी १५८९२ इतके आहेत. सदर बाधितांना रू.३,९४,४८,७३५/- इतक्या मदतीचे वाटप करण्यात आले आहे.

नाशिक जिल्हयामध्ये बाधित ५०,७३१ शेतकऱ्यांना रू.६४४०.५७ लक्ष इतक्या मदतीचे वाटप करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील दुष्काळग्रस्त गावांना सवलती मिळण्याबाबत

**(६) १६२९५ (०६-०३-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०१४-१५ या वर्षीच्या पिकांच्या आणेवारीनुसार महसूल विभागाने ५० पेक्षा कमी पैसैवारी असणारी गावे, १३ मार्च, २०१५ रोजी जाहिर केल्यानुसार त्यात राज्यातील १०७८ गावांचा समावेश असून दिनांक १७ एप्रिल, २०१५ रोजी जाहिर केलेल्या नवीन १२५३ गावांची भर पडल्याने, यावर्षीच्या रब्बी हंगामात टंचाई सदृध्य (दुष्काळग्रस्त) गावांची एकूण संख्या २३३१ इतकी झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दुष्काळग्रस्त गावांना शासनाने कोणकोणत्या सवलती जाहिर केल्या आहेत,
(३) असल्यास, दुष्काळग्रस्त गावांना जाहिर केलेल्या सवलती तातडीने देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१६) :**(१) होय.
शासन निर्णय क्र. एससीवाय २०१५/प्र.क्र.२८/म-७ दिनांक १३ मार्च २०१५ अन्वये ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या १०७८ गावांमध्ये व शासन निर्णय क्र.एससीवाय २०१५/प्र.क्र.९५/म-७ दिनांक १६ एप्रिल, २०१५ अन्वये ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या १२५३ गावांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे.
(२) जमीन महसूलात सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती, बीज बिलात ३३.५% इतकी सुट, परीक्षा शुल्कात माफी (इयत्ता १० व १२ वी), रोहयो अंतर्गत कामांच्या निकषात शिथिलता, पिण्याच्या पाण्याचे टँकर्स व शेतकऱ्याच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे या सवलती जाहिर केल्या आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदेड शहरात अल्पवयीन मुलांकडे वाहनांचा ताबा असल्याबाबत

**(७) १७०९३ (११-०८-२०१५). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील अनेक अल्पवयीन मुलांकडे वाहने असल्याने ही अल्पवयीन मुले शहरातील मुख्य रत्यावरुन कट मारुन बेजबाबदारपणे वाहन चालवत अपघात करत असून इतर सर्वसामान्य वाहनधारकांना त्याचा नाहक त्रास सोसावा लागत असून काही प्रसंगी जीव गमवावा लागत असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा अल्पवयीन मुलांच्या वाहनपरवाना संदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-१०-२०१६) :**(१) नांदेडमधील अशोकनगर येथे दि.१७ जानेवारी, २०१५ रोजी एक १४ वर्षे वयाचा मुलगा मोटार सायकलवरून शिकवणीसाठी जात असताना रस्त्यावर टाकण्यात आलेल्या रेतीवरून मोटार सायकल घसरून त्याचा मृत्यु झाल्यासंदर्भात स्थानिक पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) प्रादेशिक परिवहन कार्यालय, नांदेड यांचेमार्फत एप्रिल ते ऑगस्ट, २०१५ या कालावधीत नांदेडमध्ये केलेल्या तपासणीदरम्यान विना-अनुज्ञप्ती वाहन चालविणाऱ्या एकूण ४८ अल्पवयीन वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील आत्महत्याग्रस्त, कर्जबाजारी शेतक-यांच्या समस्या सोडविल्या जाव्यात या मागणीसाठ शेकडो शेतकऱ्यांनी पांढरकवडा येथे उपोषण करुन सत्याग्रह केल्याबाबत**

**(८) १७८६४ (०६-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आत्महत्याग्रस्त, कर्जबाजारी शेतक-यांच्या समस्या सोडविल्या जाव्यात या मागणीसाठ शेकडो शेतकरी, विधवा व दुष्काळग्रस्त शेतक-यांनी विदर्भातील पांढरकवडा येथे दिनांक १ मे, २०१५ रोजी उपोषण करुन सत्याग्रह केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांनी सदर केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय, आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) तसेच राज्यातील शेतक-यांच्या आत्महत्येला आळा घालण्यासंदर्भात आतापर्यंत शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-११-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) शेतकरी आत्महत्या पात्र  प्रकरणी रूपये एक लाख मदत देण्यात येते शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासनाकडून शेतकऱ्यांसाठी विविध उपाययोजना, अभियान राबविण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लातूर जिल्हयात दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकयांकडे जनावरासाठी**
**चारा टंचाई निर्माण झाल्याबाबत**

**(९) २१०५३ (१०-०८-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्हयात दुष्काळी परिस्थितीमुळे शेतक-याकडे जनावरासाठी चारा उपलब्ध नसल्याने चारा टंचाई निर्माण झाल्यामुळे स्थानिक लोक प्रतिनिधींनी चारा छावण्या व चारा डेपो उघडण्याबाबत दिनांक २१ मे, २०१५ रोजी लातूर, रेणापुर तालुका आढावा बैठकीत तहसील प्रशासनास सुचना केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर लातूर जिल्हयात चारा टंचाई निवारणासाठी चारा छावण्या व चारा डेपो उघडण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६)** :(१) होय हे खरे आहे.
(२) याबाबत चौकशी करण्यात येऊन चारा छावणी उघडण्यासाठी इच्छुक सेवाभावी संस्थांना जिल्हाधिकारी स्तरावरुन अवगत करण्यात आले आहे.
(३) शासन निर्णय क्र. एससीवाय :- २०१५/प्र.क्र.२४८/म-७, दिनांक २० ऑगस्ट, २०१५ अन्वये लातूर जिल्हयातील टंचाईग्रस्त भागात चारा छावण्या सुरु करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील खरीप हंगाम २०१४ मध्ये नुकसान झालेल्या**
**शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(१०) २२४०३ (०६-०८-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खरीप हंगाम २०१४ मध्ये नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद जिल्ह्यात सदर हंगामात बागायती व फळबागांचे क्षेत्र किती होते तसेच या हंगामात बागायती व फळबागांच्या क्षेत्रापैकी किती क्षेत्र बाधित झाले,
(३) असल्यास, बाधित क्षेत्रासाठी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) बाधीत क्षेत्र - हे.आर.
बागायत - १२३४.२५
बहूवार्षिक - ५२८.००
(३) शासन निर्णय क्रमांक - एससीवाय :- २०१४/प्र.क्र.२५७/म-७, दिनांक १४ जानेवारी, २०१५ अन्वये सन २०१४-१५ च्या खरीप हंगामातील ५० पैशापेक्षा कमी अंतीम पैसेवारी असलेल्या गावांमध्ये विविध उपाययोजना जाहिर करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तारापूर (जि.पालघर) येथे एक हजार मेगावॅट क्षमतेच्या नवीन प्रकल्पासाठी सर्वेक्षण होऊनही नवीन पुनर्वसन धोरणाच्या लाभापासून स्थानिक ग्रामस्थांना वंचित राहावे लागत असल्याबाबत**
**(११) २२७६९ (०६-०८-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तारापूर (जि.पालघर) येथे एक हजार मेगावॅट क्षमतेच्या नवीन प्रकल्पासाठी सर्वेक्षण सुरू होऊनही २००३ मध्ये मंजूर झालेल्या नवीन पुनर्वसन धोरणाच्या लाभापासून स्थानिक ग्रामस्थांना वंचित राहावे लागत असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालिन माजी पंतप्रधान यांच्या कार्यालयात तारापूर येथे ५४० मेगावॅट क्षमतेचे २ प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उपरोक्त प्रकल्पासाठी जमिन संपादनाच्यावेळी जमिनीच्या मोबदल्यात जमिन देण्याची विनंती शासनाच्या वरिष्ठ स्तरावरून मान्य करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, २००३ मध्ये सरकारचे नवीन पुनर्वसन धोरण अंमलात आले परंतु नव्या धोरणाचा लाभ तारापूरच्या प्रकल्पग्रस्तांना मिळालेला नाही व प्रकल्पग्रस्तांचे योग्य प्रकारे नियमानुसार पुनर्वसन होण्यापुर्वीच पोफरण व अक्करपट्टी या गावातील ग्रामस्थांना इतरत्र हालवूनही त्यांचे पुनर्वसन योग्य प्रकारे झाले नाही, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासन नवीन पुनर्वसन धोरणाच्या अनुषंगाने कोणती कारवाई करणार आहे तसेच या प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे योग्य प्रकारे पुनर्वसन करण्याबाबत कोणती तातडीची उपाययोजना करण्यार आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०८-२०१६)** :(१) हे खरे नाही.

तारापूर अणुउर्जा प्रकल्प टप्पा क्र. ३ व ४ मुळे विस्थापित झालेल्या कुटुंबाचे सर्वेक्षण जानेवारी, १९९४ मध्ये करण्यात आले होते. त्यानुसार मौजे अक्क्रपट्टी व पोफरण या दोन गावातील विस्थापित कुटुंबांची संख्या ११६७ होती. तद्नंतर कृती समितीने मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार विस्थापित कुटुंबांच्या संख्येमध्ये वाढ होऊन ती १२५० इतकी झाली आहे. सदर विस्थापित कुटुंबांचे दहिसर तर्फे तारापूर येथील स.नं. १३६ येथील ९८ हेक्टर शासकीय जमिनीवर पुनर्वसन करण्यात आले असून तेथे देय नागरी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. १२५० विस्थापित कुटुंबास १८५ चौ.मी. ते ७४० चौ.मी. चे भूखंड व त्यावर प्रकल्पग्रस्तांना ३०० चौ. फुटाची घरे बाधून वाटप करण्यात आले आहे. तथापि, ३ प्रकल्पगस्त आढळून न आल्याने त्यांना घरांचे वाटप करता आलेले नाही. प्रकल्पग्रस्तांना प्रति हेक्टर २.५ लक्ष सानुग्रह अनुदान देण्यात आलेले आहे. तसेच भूमिहीन प्रकल्पग्रस्तांना प्रतिकुटुंब रु. ३०,०००/- स्वेच्छा अनुदान देण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय. मौजे अक्करपट्टी व पोफरण येथील ३३४ पैकी २८९ प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांना जमिनीच्या बदल्यात जमीन देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्यानुसार २३० प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात आले असून, उर्वरित प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनीचे वाटप करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) हे खरे आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माळीण दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर आंबेगाव तालुक्यातील १३ गावांचे सर्वेक्षण करण्याबाबत**

**(१२) २४५०२ (१२-०८-२०१५). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेल्या वर्षी दिनांक ३० जुलै, २०१४ मध्ये झालेल्या माळीण दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर आंबेगाव तालुक्यातील १३ गावांचे वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या (जीएसडी) मार्फत नुकतेच सर्वेक्षण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी पाच वाड्यांना माळीणप्रमाणे दरड कोसळण्याचा धोका असल्याचा अहवाल या संस्थेने सहा महिन्यापूर्वी दिला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संस्थेने इशारा देवूनही प्रशासनाने अद्याप या वाड्यांच्या पुर्नवसनासाठी काहीच कार्यवाही वा उपाययोजना केल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पाच वाड्यातील ग्रामस्थांची पुर्नवसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०९-२०१६) :**(१) होय.

(२), (३) व (४) भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडून अहवाल जिल्हाधिकारी, पुणे यांना प्राप्त झाला असून याबाबत भारतीय भूवैज्ञानिक सर्व्हेक्षण, पुणे यांचेकडून अंतिम सर्वेक्षण अहवाल येणे बाकी आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयामध्ये यावर्षी शेतकऱ्यांना पावसाआधी सोयी-सुविधा देण्याबाबत**

**(१३) २४७३१ (११-०८-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयामध्ये यावर्षी शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात बियाणे पुरविणे, कापूस बियाणांचा काळाबाजार रोखणे, रॅकपॉईटवरुन खते उपलब्ध करुन देणे, संरक्षित ओलितासाठी वेळेवर पाणी उपलब्ध करणे, राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून शेततळे पुन्हा सुरु करणे, यासारख्या उपाययोजना यंदाच्या पावसाआधी शेतकऱ्यांना सोयी-सुविधा देण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना दिनांक १० जून, २०१५ रोजीच्या सुमारास एक लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनातील सुचनांनुसार शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०५-१०-२०१६) :**(१) होय.

(२) जिल्हयामध्ये शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात बियाणे उपलब्ध होण्याबाबत योग्य ते नियोजन करून त्यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे. शेतकऱ्यांची जास्त मागणी असलेल्या बी.टी. कापूस बियाण्यांची आवश्यक प्रमाणात उपलब्धता करून देण्यात आली आहे. कापूस बियाणांचा काळाबाजार झाल्याची तक्रार हंगामात प्राप्त झाली नाही, तसेच काळाबाजार होणार नाही याची दक्षत घेण्यात आली आहे. जिल्हयात मागणीप्रमाणे रॅकपॉईंटवरून खते उपलब्ध झाली असून खताची कमतरता आढळून आलेली नाही.

संरक्षित ओलीतासाठी पाणी उपलब्ध करून देण्याकरिता जलयुक्त शिवार अभियानांतर्गत विविध विभागाकडून मृद व जलसंधारणाची कामे करण्यात येत आहेत.

रोजगार हमी योजनेंतर्गत शेततळे घेण्याची योजना राबविण्याबाबत आवश्यक कार्यवाही नियोजन विभागाकडून (रोहयो प्रभाग) करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चोपडा तालुक्यातील (जि.जळगाव) अडावद, गोरगांवले आणि यावल तालुक्यातील यावल सर्कल येथील शेतक-यांना नुकसानभरपाई देण्याबाबत**

**(१४) २५७४२ (१२-०८-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा तालुक्यातील (ज. जळगांव) अडावद व गोरगांवले सर्कल आणि यावल तालुक्यातील यावल सर्कल येथील शेतक-यांना सन २०१२ मध्ये झालेल्या केळी बागाच्या नुकसानीची नुकसानभरपाई सदोष हवामान यंत्रामुळे शेतक-यांना मिळू शकली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सर्कलमधील शेतक-यांना तातडीने नुकसानभरपाई देण्याबाबत पिक विमा कंपन्यांना निदेश देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०९-२०१६) :**(१) होय. अंशत: खरे आहे.

(२) व (३) होय. सन २०१२ मध्ये चोपडा तालुक्यातील अडावद व गोरगावले सर्कलमधील शेतकऱ्यांना स्वयंचलित हवामान केंद्रातील नोंदीनुसार समाविष्ट धोक्याकरिता विमा संरक्षित रक्कम लागू झाली नाही. तसेच यावल सर्कलमधील ६.३५ शेतकऱ्यांना ९३२.८९ हे आर क्षेत्राकरिता रू.६९९.६७ लक्ष इतक्या रक्कमेचा विमा लागू झालेला असून बँकेमार्फत संबंधित शेतकऱ्यांच्या त्यांच्या खात्यावर जमा करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर आणि उस्मानबाद जिल्ह्याची आणेवारी ५० पैश्यापेक्षा कमी असताना आणेवारीची पध्दती ब्रिटीशकालीन असल्याबाबत**

**(१५) २६२०४ (११-०८-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर आणि उस्मानाबाद जिल्ह्याची आणेवारी ५० पैश्यापेक्षा कमी असताना आणेवारीची पध्दती ब्रिटीशकालीन असल्याने सदर सदोष पध्दतीमुळे शेतक-यांचे नुकसान होवून पुरेशा प्रमाणता मदत मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीतअंती सदर जिल्ह्यातील शेतक-यांना नुकसानीच्या प्रमाणात मदत देणेबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०९-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२) व (३) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक - एससीवाय :- २०१५/प्र.क्र.३११/म-७, दिनांक २०/१०/२०१५ अन्वये दुष्काळग्रस्त भागात विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत.तसेच दुष्काळग्रस्तदृश्य परिस्थितीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसान भरपाई पोटी आर्थिक मदत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोरिवली (पूर्व), मुंबई येथील नॅन्सी कॉलनी येथील एस.टी. बस डेपो च्या संपूर्ण जागेवर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची प्रशासकीय इमारत उभारण्याबाबत**

**(१६) २८०६३ (०८-०९-२०१५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरिवली (पूर्व), मुंबई येथील नॅन्सी कॉलनी येथील एस.टी. बस डेपो च्या संपूर्ण जागेवर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची प्रशासकीय इमारत उभारुन प्रवाश्यांना आवश्यक त्या सोयी-सुविधा द्याव्यात, तसेच जमिनीवर राहत असलेल्या मूळ रहिवाश्यांचे पुनर्वसन करावे, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने यावर निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२७-०९-२०१६)** :(१) व (२) नॅन्सी कॉलनी, बोरीवली येथील वाहतूक नियंत्रण कक्षाच्या बाजूला १४ झोपडया असून सदर जागेचा उप जिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन) यांच्या २०१० च्या अहवालात सदर झोपडयांपैकी ७ झोपडया पात्र, २ अपात्र व ५ अनिर्णित असे वर्गीकरण करण्यात आले आहे. अपात्र झोपडीधारकांचे निष्कासन तातडीने करणेबाबत उप जिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन) यांना दिनांक ११.०७.२०१६ च्या पत्रान्वये राज्य परिवहन महामंडहाव्दारा कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळंब तालुक्यातील कन्हेरवाडी येथील तानाजी सुब्राव जाधव यांनी आत्महत्या केल्याबाबत**

**(१७) २८२०० (२७-१०-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कन्हेरवाडी (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथील तानाजी सुब्राव जाधव यांनी खाजगी सावकाराकडील कर्ज व नापिकीला कंटाळून दिनांक ३ जानेवारी, २०१५ रोजी आत्महत्या केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने काय चौकशी केली व करण्यात येत आहे,

(३) असल्यास, मयत शेतकऱ्याच्या वारसास मदत देण्याच्या हेतूने व कर्जापोटी गहान असलेल्या जमिनी व इतर बाबी त्यांना परत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) तानाजी सुब्राव जाधव यांच्या वारसास रुपये १,००,०००/- इतकी मदत शासनातर्फे देण्यात आली आले. तानाजी जाधव यांच्या कडे खाजगी सावकाराचे कर्ज असल्याचे किंवा कर्जा पोटी जमीन गहान ठेवल्याचे चौकशीत आढळून आले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील दुष्काळग्रस्त गावांना सवलती मिळण्याबाबत**

**(१८) २८२७१ (१५-१२-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०१४-१५ या वर्षीच्या पिकांच्या ५० पेक्षा कमी पैसेवारी असणारी गावे, दिनांक १३ मार्च, २०१५ रोजी जाहिर केल्यानुसार, त्यात राज्यातील १०७८ गावांचा समावेश होता, त्यामध्ये दिनांक १७ एप्रिल, २०१५ रोजी जाहीर केलेल्या नवीन १२५३ गावांची भर पडल्याने, यावर्षीच्या रब्बी हंगामात टंचाई सदृश्य (दुष्काळग्रस्त) गावांची एकूण संख्या २३३१ इतकी झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दुष्काळग्रस्त गावांना शासनाने कोणकोणत्या सवलती जाहिर केल्या आहेत,
(३) असल्यास, जाहीर केलेल्या सवलतीनुसार दुष्काळग्रस्तांना सवलती मिळाल्या आहेत काय,
(४) असल्यास, दुष्काळग्रस्तांना सवलती अद्याप मिळाल्या नसतील तर त्या तातडीने देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१६) :**(१) होय.

शासन निर्णय क्र. एससीवाय २०१५/ प्र.क्र.२८/म-७, दिनांक १३ मार्च २०१५ अन्वये ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या १०७८ गावांमध्ये व शासन निर्णय क्र.एससीवाय २०१५/प्र.क्र.९५/म-७, दिनांक १६ एप्रिल, २०१५ अन्वये ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या १२५३ गावांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे.
(२) जमीन महसूलात सुट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती, वीज बिलात ३३.५% इतकी सुट, परीक्षा शुल्कात माफी (इयत्ता १० व १२ वी), रोहयो अंतर्गत कामांच्या निकषात शिथिलता, पिण्याच्या पाण्याचे टॅंकर्स, व शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे या सवलती जाहिर केल्या आहेत.

(३) होय, याबाबत संबंधीत प्रशासकीय विभागाकडून शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील चारही बाजूला असलेल्या टेकड्यांचे सर्वेक्षण करण्याच्या निर्णयाबाबत**

**(१९) २८८७४ (१३-०१-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील माळीणच्या दुर्घटनेनंतर पुणे जिल्ह्यातील चारही बाजूला असलेल्या टेकड्यांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय सन २०१४ वा त्या दरम्यान घेण्यात आला होता हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाला एक वर्ष लोटले तरी अद्याप टेकड्यांचे सर्वेक्षणाचे काम हाती घेण्यात आले नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे जिल्ह्यातील टेकड्यांचे सर्वेक्षण केव्हापर्यंत करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०८-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) याबाबत अधिक्षक भूवैज्ञानिक, भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण, आळंदी रोड, पुणे यांचेकडून अहवाल प्राप्त झालेनंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील गावांना भूस्खलनाचा धोका असल्याबाबत**

**(२०) २९०४८ (१८-०१-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शाहुवाडी, पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील अनेक गावामध्ये झालेली जंगलतोड, फार्म हाउसच्या नावाखाली फोडलेले डोंगर, बदललेले जलप्रवाह आणी निसर्गामध्ये मोठ्या प्रमाणावर केलेला हस्तक्षेपामुळे जमिनीचे कधी भूस्खलन होईल हे सांगता येत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास आपटी (ता.पन्हाळा जि.कोल्हापूर) गावातील २००७ मध्ये झालेल्या भूकंपात ७ घरे जमीनदोस्त झाली होती, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, भूस्खलनाचा धोका टाळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-१०-२०१६)** :(१) होय.

(२) अंशत: खरे आहे. आपटी गावात भूस्खलनामुळे ४ घरे पूर्णत: पडलेली होती.

(३) मौजे आपटी येथील बाधित कुटूंबाचे पुनर्वसन करण्याचे काम तहसीलदार यांचेमार्फत सुरु आहे. तसेच शाहूवाडी तालुक्यातील गावांमधील भूस्खलनाचा धोका असणाऱ्या कुटूंबाचे पुनर्वसन करण्याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी, कोल्हापुर यांनी विभागीय आयुक्त, पुणे यांना सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकऱ्यांची आर्थिक सुबत्ता आणण्याबाबत

**(२१) २९२१४ (१३-०१-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकरी गेली ५ वर्षे सलग अल्प पर्जन्यमान व दुष्काळी परिस्थितीमुळे जिल्ह्यात आत्महत्येचे प्रमाण वाढतच चालले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी व आर्थिक सुबत्ता आणण्यासाठी शेती संबंधित कमी व्यवस्थापन खर्च असणाऱ्या एखादे सक्षम जोडधंद्याची आवश्यकता असून असा जोड धंदा म्हणून उस्मानाबादी शेळी पालन या व्यवसायाकडे गांभीर्याने पाहता येऊ शकते, हेहि खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी उस्मानाबाद जिल्ह्यात याचा कृती आराखडा आखून त्याची अंमलबजावणी करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६)** :(१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) राज्य शासनामार्फत उस्मानाबाद जिल्ह्यात विविध योजनातून उस्मानाबादी जातीच्या शेळ्याचा पुरवठा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धुळे तालुक्यात अवकाळी पाऊस, गारपीठ, दुष्काळ, कर्जाचा डोंगर या कारणास्त ३५ शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या

**(२२) २९४५४ (१६-०१-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे तालुक्यात अवकाळी पाऊस, गारपीठ, दुष्काळ, कर्ज इत्यादी कारणामुळे आठ महिन्यात ३५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यापैकी किती शेतकरी शासकीय मदतीसाठी पात्र ठरले आहेत,
(३) असल्यास, एकूण किती शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६)** :(१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) धुळे तालुक्यात माहे जानेवारी, २०१५ ते सप्टेंबर, २०१५ दरम्यान एकूण १७ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. सदर १७ आत्महत्यापैकी एकूण १३ पात्र शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना शासन निर्णय क्रमांक :-एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७ दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये रुपये १,००,०००/- इतकी मदत देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्ह्यात सन २०१५ मध्ये एकूण १० जणांचा वीज बळी गेला असल्याबाबत

**(२३) २९६६१ (१६-०१-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यात सन २०१५ मध्ये एकूण १० जणांचा वीज बळी गेला असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दरवर्षी जितीत व वित्तहानी होण्याचे प्रमाण वाढत असल्याने जिल्ह्याच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने वीज अटकाव यंत्रणा बसविण्यासाठी राज्य शासनाकडे वर्षापूर्वी प्रस्ताव पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वर्षभरापासून वीजरोधक यंत्रणेच्या उपयुक्तेचा अभ्यास पूर्ण झाला असल्यास यापुढे शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०९-२०१६)** :(१) होय.
(२), (३) व (४) लातूर जिल्हयातील औसा, उदगीर आणि चाकूर तालुक्यात चार ठिकाणी वीज अटकाव यंत्रणा बसविण्यात आली आहे.

---

## संगमनेर तालुक्यातील पूर्व व पठार भाग येथे कमी पावसामुळे पिके पाण्याविना जळून गेल्याबाबत

**(२४) २९६६४ (१६-०१-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर तालुक्यातील पूर्व व पठार भाग येथे पावसाने हुलकावणी दिल्याने पिके पाण्याविना जळून गेल्याने शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तालुक्यातील पूर्व व पठार भाग दुष्काळग्रस्त म्हणून जाहिर करुन राष्ट्रीय पीक विम्यात येथील गावांचा समावेश करुन येथील शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१५/प्र.क्र.३११/म-७ दिनांक २० ऑक्टोबर, २०१५ अन्वये राज्यातील खरीप हंगामातील ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी आलेल्या गावात दुष्काळग्रस्तदृश्य परिस्थिती जाहिर करुन विविध उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय कृषि पिक विमा योजना व हवामान आधारित पिक विमा योजनेस सन २०१५-१६ मध्ये व्यापक प्रमाणात प्रचार व प्रसिध्दी करुन जास्तीत जास्त शेतकऱ्यांना प्रचार व प्रसिध्दी करुन जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या योजनेत सहभागी होण्याचे अवाहन करण्यात आले. माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये हवामान आधारीत पिक विमा योजनेत सहभागी १३,९४५ शेतकऱ्यांना रुपये १३३.३७ लाख तसेच माहे मे २०१६ मध्ये राष्ट्रीय कृषि पिक विमा योजनेत ४५४५ शेतकऱ्यांना रुपये ११०.९६ लाख इतकी रक्कम विम्यापोटी नुकसान भरपाई म्हणून मिळाली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांना रब्बी अनुदानाचे तात्काळ वाटप करण्याबाबत**

**(२५) २९६९२ (१५-०१-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यात रब्बी अनुदान उपलब्ध होवूनही तीन महिन्यांचा कालावधी उलटला परंतु अद्याप ९५ हजार ४७५ बाधित शेतकऱ्यांना अनुदानाचा एक पैसाही मिळाला नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अहमदनगर जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांना रब्बी अनुदानाचे तात्काळ वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२) रब्बी हंगाम २०१४-१५ मधील बाधीत शेतकऱ्यांना अर्थ सहाय्य करण्यासाठी अहमदनगर जिल्हयात रुपये २२६.९८६ कोटी इतकी रक्कम प्राप्त झाली होती सदर अनुदानापैकी पात्र २,९०,७९० शेतकऱ्यांना रुपये १६४,६०,९०,४५९/- इतकी रक्कम वाटप करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्रीरामपूर तालुक्यात नापिकी, कर्जबाजारीपणा आणि तोट्यातील दूध धंदा यामुळे पाच शेतकऱ्यांनी केलेली आत्महत्या**

**(२६) २९७१२ (१६-०१-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीरामपूर तालुक्यात नापिकी, कर्जबाजारीपणा आणि तोट्यातील दूध धंदा या तीन कारणांमुळे गेल्या वर्षभरात पाच शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांच्या कुटूंबाला आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६)** :(१) होय,अंशत: खरे आहे.
(२) अहमदनगर जिल्हयातील श्रीरामपूर तालुक्यातील जानेवारी, २०१५ ते ऑगस्ट, २०१५ दरम्यान एकूण सहा शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. सदर सहा आत्महत्यांपैकी एकूण पाच पात्र शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासन निर्णय क्रमांक :-एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७ दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये रुपये १,००,०००/- इतकी मदत देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी जिल्हयातील शेतकऱ्यांनी शिगणापूर फाटयावर, परभणी जिल्हा दुष्काळग्रस्त म्हणून जाहिर करावा व शेतकऱ्यांना संपूर्ण कर्ज माफी देण्याबाबत**

**(२७) ३००४७ (१८-०१-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हयातील शेतकऱ्यांनी शिगणापूर फाटयावर, परभणी जिल्हा दुष्काळग्रस्त म्हणून जाहिर करावा व शेतकऱ्यांना संपूर्ण कर्ज माफी देण्यात यावी या मागणी करिता दिनांक ०३ सप्टेंबर, २०१५ रोजी दुष्काळ दौऱ्यांवर असलेल्या मा.मुख्यमंत्र्यांचा रस्ता रोको आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना पोलिसांनी लाठीकाठीने झोडपून काढले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी अधिक चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांवर लाठीचार्ज करावयास सांगणा-या पोलीस अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) या प्रकरणी पोलीस प्रशासना मार्फत करण्यात आलेली कृति योग्य व कायदेशीर असल्याने संबंधित पोलीस अधिकाऱ्यांचे चौकशी करण्याची आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लातुर जिल्ह्यात चारा उपलब्ध नसल्याबाबत**

**(२८) ३००५६ (१८-०१-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यातील पशुधनाच्या चा-यासाठी ४४ कोटी रूपयांचा निधी शासनाकडून संबंधित जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त आहे मात्र या जिल्ह्यात केवळ तीनच चारा छावण्या सुरू असल्याने हा निधी पडून असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लातुर जिल्ह्यात चारा उपलब्ध नाही या कारणास्तव प्रशासन व सहकारी संस्था, साखर कारखाने तसेच सेवाभावी संस्थांना चारा छावण्या सुरू करण्यासंदर्भात आवाहन करण्यात आले हे खरे आहे काय,
(३) असल्यास,लातूर जिल्हा प्रशासनाकडे दहा ते बारा प्रस्ताव दाखल झाले परंतू केवळ आठ प्रस्तावांना मंजूरी मिळाली तद् नंतर केवळ पाच चारा छावण्या सुरू झाल्या आणि दोन बंदही पडल्या, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, लातूर जिल्ह्यातील कोणत्याही तालुक्यात चारा उपलब्ध नसल्याने शासनाने चाऱ्याकरिता ४४ कोटी रूपयांचा निधी मंजूर केला आहे, परंतू तो खर्चाविना पडून आहे तरी याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) लातूर जिल्हयात चारा छावण्या उघडण्याचे १२ प्रस्ताव प्राप्त झाले होते. या प्रस्तावापैकी ८ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली होती परंतु प्रत्यक्षात पाचच छावण्या सुरु झाल्या.

(४) सदर निधी हा चा-यासाठी नसून चारा छावण्यासाठी उपलब्ध करुन दिला होता. चारा छावणीतील खर्च भागविण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध असल्यामुळे उर्वरित निधी समर्पित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यातील कोतवाल खुर्द, कोंढवी आणि लोहारे पवारवाडीतील २५ दरडग्रस्त गावांना नैसर्गिक आपत्ती निवारण आराखड्यांमध्ये समावेश करण्याबाबत**

**(२९) ३०२९१ (१६-०१-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यातील कोतवाल खुर्द, कोंढवी आणि लोहारे पवारवाडीतील २५ व २६ जुलै, २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीदरम्यान महापूर व भूस्खलनाच्या घटनांनंतर तालुक्यातील २५ दरडग्रस्त गावांना नैसर्गिक आपत्ती निवारण आराखड्यांमध्ये समावेश करण्याची शासनाने घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घोषणावर अंमलबजावणी करण्यात आली आहे काय, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) जिल्हा स्तरावरील आराखडयामध्ये पोलादपूर तालुक्यातील कोतवाल खुर्द व कोढवी या गावांसह २५ गावांचा समावेश करण्यात आला आहे. लोहारे पवारवाडी येथे दरडी कोसळण्याचा धोका नसल्यामुळे या गावाचा समावेश करण्यात आलेला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील औरंगाबाद-पुणे सह ११६ ठिकाणी माळीण सारखी दुर्घटना होण्याची शक्यता राज्य आपत्ती व्यवस्थापनाने व्यक्त केल्याबाबत**

**(३०) ३११५३ (१६-०१-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील औरंगाबाद-पुणेसह ११६ ठिकाणी माळीण (जिल्हा पुणे) सारखी दुर्घटना होऊ शकते अशी शक्यता राज्य आपत्ती व्यवस्थापन अहवालात नमूद केल्याचे दिनांक १७ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भूस्खलनाचा धोका असणाऱ्या ११६ डोंगरांची यादी व त्याबाबतचा अहवाल राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने केंद्र सरकारकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ११६ ठिकाणे कोणती आहेत तसेच माळीण सारखी पुर्नरावृत्ती होऊ नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०८-२०१६) :**(१) नाही.
(२), (३) व (४) केंद्र शासनाच्या लॅण्डस्लाईड रिस्क मिटीगेशन स्कीम (LRMS) अंतर्गत केंद्र शासनाने सुचविल्यानुसर जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रापत झालेल्या यादीतून राज्यातील खालील १३ अतिधोकादायक दरड आपत्तीप्रवण ठिकाणांची यादी केंद्र शासनास दि.१७.०४.२०१५ रोजी पाठविण्यात आली आहे.

(१) रायगड जिल्ह्यातील जुई, कोंडिवते, दासगांव आणि खारगांव सकलप
(२) पुणे जिल्ह्यातील काळवाडी (बोरघर) असाने आणि तळेघर
(३) रत्नागिरी जिल्ह्यातील वडद-हासोल (गितेवाडी) आणि हर्णे (राजीवाडी)
(४) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली घाट
(५) सातारा जिल्ह्यातील एरंडल, भेकावळी आणि तोलेवाडी

---

## सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा, माढा, मोहोळ, बार्शी या तालुक्यांतील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियाला मदत करण्याबाबत

**(३१) ३१४७९ (१६-०१-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा, माढा, मोहोळ, बार्शी या तालुक्यांतील कर्ज झालेल्या १० शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्येनंतर त्यांच्या कुटुंबियांचे जिल्ह्याच्या महसूल विभागाकडे केलेले आर्थिक मदतीचे प्रस्ताव फेटाळून लावले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कुटुंबियाला मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६) :**(१) जानेवारी २०१५ ते डिसेंबर, २०१६ या कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा, माढा, मोहोळ, बार्शी तालुक्यातील एकूण ३१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यापैकी शासन निकषा नुसार एकूण ३ प्रस्ताव मदतीसाठी पात्र तर २८ प्रस्ताव मदतीसाठी अपात्र ठरले आहेत.
(२) शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७ दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये पात्र शेतकऱ्यांच्या वारसांना रुपये १,००,०००/- इतकी मदत देण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात दुष्काळग्रस्त सुमारे १४ हजार ७०८ गावांकरिता सवलती व सुविधा देण्याबाबत**

**(३२) ३२२९१ (१८-०१-२०१६). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १४ हजार ७०८ गावाची पैसेवारी ५० टक्क्यापेक्षा कमी असल्याने या गावांत शासनाने माहे ऑक्टोबर, २०१५ च्या सुमारास दुष्काळ जाहिर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दुष्काळग्रस्त गावांकरिता शासनाने कोणकोणत्या सवलती व सुविधा देणार आहे,

(३) असल्यास, राज्यातील विदर्भ, मराठवाडा व कोकणातील काही गावांमध्ये पैसेवारी ५० टक्क्यापेक्षा कमी असून त्या गावांचा दुष्काळग्रस्त गावामध्ये न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या दुष्काळग्रस्त गावांकरिता सवलती व सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१६) :**(१) होय.

(२) जमीन महसुलात सुट, कृषी पंपाच्या चालू वीज देयकात ३३.५% इतकी सुट, शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर व दुष्काळ जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे, सरासरी पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती या सवलती जाहीर केल्या आहेत.

(३) पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असणे या बरोबर ७५% पेक्षा कमी पर्जन्यमान असणे हा निकष देखील ग्राहय धरला जातो.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयात पावसाळ्यात दरड कोसळून अथवा**
**भूस्खलनाद्वारे धोका निर्माण झाल्याबाबत**

**(३३) ३२५५१ (१६-०१-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात पावसाळ्यात दरड कोसळून अथवा भूस्खलनाद्वारे धोका निर्माण झाला आहे याबाबतची आकडेवारी कोल्हापूर प्रशासनाकडे नसल्याचे माहे जून, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोल्हापूर जिल्ह्यात दरड कोसळून तसेच भूस्खलनाद्वारे धोका असलेल्या स्थळाची अद्यावत यादी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०८-२०१६) :**(१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही. तथापि कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार व वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांना कोल्हापूर जिल्ह्यातील डोंगर उतारावर व पायथ्याशी वसलेली घरे वाड्या-वस्त्या व गांवे या सर्वेक्षण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

---

**खुलताबाद (जि.औरंगाबाद) तालुक्यातील ७६ गावे व ७३ महसूली गावांत पिकांची पैसेवारी कमी दर्शविल्याबाबत**

**(३४) ३३१८३ (१५-०१-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खुलताबाद (जि.औरंगाबाद) तालुक्यातील ७६ गावे व ७३ महसूली गावांत पिकांची नजरअंदाज पैसेवारी काढण्यात आली असून तालुक्यातील पूर्ण गावांची पैसेवारी पूर्वीच्या ५० पैशापेक्षा कमी दर्शविण्यात आली असल्याचे माहे १७ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पैसेवारी ५० पेक्षा कमी असल्याने येथील शेतकऱ्यांनी शासनाकडे मदतीची अपेक्षा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१४/प्र.क्र.२५७/म-७ दिनांक १४ जानेवारी, २०१५ अन्वये सन २०१४-१५ च्या खरीप हंगामातील ५० पैशापेंक्षा कमी अंतीम पैसेवारी असलेल्या गावांमध्ये विविध उपाययोजना जाहिर करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्याच्या सीमावर्ती भागातील १४ गावांमध्ये अतिवृष्टीमुळे कापूस, ज्वारी, सोयाबीन पिकांचे नुकसान झाल्याबाबत

**(३५) ३३६२९ (१६-०१-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्याच्या सीमावर्ती भागातील १४ गावांमध्ये माहे सप्टेंबर २०१५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांचे कापूस, ज्वारी, सोयाबीन आदी पिकांचे नुकसान झाले असतानाही अद्याप सदरहू गावामधील पिकांचे शसनातर्फे सर्वेक्षण करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू सीमावर्ती भागातील १४ मराठी भाषिक गावे दिनांक १७ जुलै, १९९७ च्या मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्याची असतानाही शासनाने सदरहू गावातील शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेल्या नुकसानीबाबत अद्याप सर्वेक्षण करुन त्यांना मदत न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने तातडीने नुकसान भरपाई देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-१०-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) उपरोक्त १४ गावे तेलंगणा (जुना आंध्रप्रदेश) व महाराष्ट्र सीमावर्ती भागातील आहेत. सदर गावांचा महसूल अभिलेख उपलब्ध नाही. तसेच सदर गावांची जमाबंदी/मोजणी झालेली नसल्याने शेतकऱ्यांचा मालकी हक्क व किंवा त्यांचेकडील पिकाखालील क्षेत्राबाबत खात्री होत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे.निलुनगर तुरोरी तांडा (ता.उमरगा) येथील बेघर लोकांना पर्यायी वस्तीवाढीबाबत

**(३६) ३३७७० (१६-०१-२०१६). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे.निलुनगर तुरोरी तांडा (ता.उमरगा) येथील बेघर लोकांना पर्यायी वस्तीवाढीसाठी गायरान सर्व्हे नं.४३ मधील ०४ हे ०० आर जमिनीचे अभिहस्तांतरण करुन मिळणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना दिनांक ०४ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे सुचीत केले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेघर लोकांना पर्यायी वस्तीवाढीसाठी गायरान सर्व्हे नं.४३ मधील ०४ हे ०० आर जमिनीचे अभिहस्तांतरण करुन मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०८-२०१६) :**(१) होय.
(२) या प्रकरणी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद कार्यालयामार्फत निलुनगर तुरोरी तांडा येथील बेघर लोकांना पर्यायी वस्तीवाढीसाठी गायरान सर्व्हे नं. ४३ मधील ०४ हे ०० आर जमिनीचे अभिहस्तांतरण करुन मिळणेबाबत कार्यवाही चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जैन समाजाच्या अत्मियतेचा मुद्दा असलेल्या सल्लेखना या धार्मिक आचरणाच्या निर्णयाबाबत**

**(३७) ३४२९० (०८-०१-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जैन समाजाच्या अत्मियतेचा मुद्दा असलेल्या सल्लेखना या धार्मिक आचरणावर गदा आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या राजस्थान उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात हातकणंगले तालुक्यातील जि.कोल्हापूर जैन समाजाच्या वतीने दि.२४.८.२०१५ रोजीच्या सुमारास तहसिल कार्यालयावर मूक मोर्चा काढून नायब तहसिलदार यांना एक लेखी निवेदनही दिले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०४-०८-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) विचाराधीन निवेदनामध्ये राजस्थान उच्च न्यायालयाच्या निर्णयासंदर्भात महाराष्ट्र शासनाने हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत ही बाब अन्य राज्याच्या उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. सबब, शासन याप्रकरणी कोणताही निर्णय घेऊ शकत नाही.

---

**राधानगरी-भुदरगड-आजरा तालुक्यात गत वर्षीपेक्षा ५५% पावसाचे प्रमाण कमी झाल्याबाबत**

**(३८) ३४४२९ (१३-०१-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी-भुदरगड-आजरा तालुक्यात गत वर्षीपेक्षा ५५% पावसाचे प्रमाण कमी झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाण्या अभावी पिकांच्या उत्पन्नामध्ये लक्षणीय घट झाल्याने भात, ज्वारी, मिरची, नाचणी, इ.पिके पूर्णपणे वाया गेली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राधानगरी-भुदरगड-आजरा तालुक्यात १००% अनुदानावर ठिबक सिंचन योजना राबवून तिन्ही तालुके दुष्काळग्रस्त जाहीर करण्याचा निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२०-०९-२०१६)** :(१) राधानगरी, भुदरगड व आजरा तालुक्यात सरासरी पावसाच्या तुलनेत सन २०१५ मध्ये अनुक्रमे २५%, ६५% आणि ४५% पाऊस पडला.
(२) पीक कापणी प्रयोगानुसार कोल्हापुर जिल्हयातील भात, खरीप ज्वारी व नागली या पिकात मागील ५ वर्षाच्या सरासरी उत्पादकतेच्या तुलनेत अनुक्रमे १८ टक्के, १६ टक्के व १८ टक्के घट आलेली आहे.
(३) सदर तिन्ही तालुक्यांमध्ये ठिबक सिंचन योजनेकरीता माहे जानेवारी, २०१६ अखेरपर्यंत एकूण ५४ लाभार्थ्यांना एकूण रु. ५.४३ लाख इतके अनुदान अदा करण्यात आलेले आहे.

राधानगरी, भुदरगड व आजरा या तालुक्यांतील गावांची पीक पैसेवारी ५० पैशांपेक्षा जास्त असल्याने तसेच दुष्काळसंदर्भातील निकषांची पूर्तता होत नसल्याने सदर तालुक्यात दुष्काळ परिस्थिती जाहीर करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहर परिसर, पारशिवनी व रामटेक तालुक्यात आणि जिल्हयात अतिवृष्टीत बाधीत झालेल्या लोकांना आणि विस्थापित कुटुंबांना मदत करण्याबाबत**

**(३९) ३४५४१ (१०-०१-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहर परिसर, पारशिवनी व रामटेक तालुक्यात आणि जिल्हयात कोसळलेल्या मुसळधार पावसात ६ जण वाहुन गेले तर ४१६ कुटुंब विस्थापित झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील सर्व रस्त्यांवर पाणी भरल्याने नागपूर काही तासासाठी जागेवर थांबणे, त्याच वेळी गोपालनगर हिंदुस्थान कॉलनी, काचीपुरा, नंदनवन, झोपडडी बाबा फरिदनगर, समतानगर हुडकेश्वर व भरतवाडा या सारख्या ११ प्रमुख वस्त्या हा जलमय झाल्या होत्या, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अतिवृष्ठीत अनेक झोपड्या वाहून गेल्या तसेच याचा फटका सेंट पॉल शाळेतील विद्यार्थी व शेकडो सामान्य नागरिकांना बसला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नागपूर शहर परिसर आणि जिल्हयात अतिवृष्टी झाल्यास कायमस्वरुपी उपाययोजना करण्याच्या आकृतीबंध कार्यक्रम शासनाने आखला आहे काय,
(५) असल्यास, या अतिवृष्टीत बाधीत झालेल्या लोकांना आणि विस्थापित कुटुंबांना व वाहुन गेलेल्या लोकांच्या कुटुंबांना शासनाने मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०९-२०१६)** :(१) व (२) हे खरे आहे.
(३) अतिवृष्टीमुळे झोपडयावाहून गेलेल्या नसून त्यामध्ये पाणी गेल्यामुळे नुकसान झाले. तसेच सेंट पॉल शाळेजवळील नाल्याला पूर आल्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना ने-आण करण्यास अडचण निर्माण झाली होती.
(४) नागपूर जिल्हयांचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी मान्य केला आहे. सदर आराखडयानुसार कार्यवाही केली जाते.
(५) नुकसानग्रस्त भागाचे सर्वेक्षण करण्यात आले असून नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही जिल्हा स्तरावर सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेवासा शहरातल (जिल्हा नगर) तालुकयातील भुजल पातळी पावसा अभावी खोल गेली असल्याने तेथील शेतक-यांची पिके, फळभाग उद्धवस्त झाल्याबाबत**

**(४०) ३४६७८ (१६-०१-२०१६). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेवासा शहरातल (जिल्हा नगर) तालुक्यातील भुजल पातळी पावसा अभावी खोल गेली असल्याने तेथील शेतक-यांची पिके, फळभाग उद्धवस्त झाले असून शेतक-यांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नेवासा तालुक्यातील शेतक-यांची पिके, फळबाग, जनावरांना चारा व पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी शासनाने कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०९-२०१६)** :(१) अंशतः खरे आहे.
नेवासा तालुक्यातील एकूण १३ गावांमध्ये वर्ष २०१५ मधील खरीप हंगामामध्ये अपुऱ्या पावसामुळे पिके व फळबागा यांचे नुकसान झालेले आहे.
(२) अवर्षणामुळे बाधित शेतकऱ्यांना मदत जाहीर करण्यात आलेली आहे. नेवासा तालुक्यातील पिके व फळबागासाठी रक्कम रुपये २,७७,२३००/- इतके अनुदान वितरीत करण्यात आले आहे. तसेच मका बियाणे वाटप, टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे यांसारख्या उपाययोजना केल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यालयात**
**दलाल विद्यार्थी व पालकांकडून आर्थिक रक्कम घेत असल्याबाबत**

**(४१) ३४७०३ (१२-०१-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्याक समाजाची आर्थिक आणि शैक्षणिक प्रगती व्हावी यासाठी नांदेड येथे कार्यरत असलेल्या मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यालयात दलालांनी शिरकाव करुन अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची दिशाभूल करुन कर्ज मिळवून देण्याचे अमिष दाखवून विद्यार्थी व पालकांकडून आर्थिक रक्कम घेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व प्रकाराला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०२-०९-२०१६) :**(१) नाही.

(२) तथापि अशा आशयाचे निवेदन मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळास प्राप्त झाले आहे. महामंडळाच्या कार्यालयात दलालांनी शिरकाव करुन अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची दिशाभूल करु नये, तसेच विद्यार्थ्यांनी कोणत्याही आमिषास बळी पडू नये, यादृष्टीने महामंडळाने त्यांच्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांना सूचना दिल्या आहेत. तसेच याबाबत प्रमुख वृतपत्रांत सूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना स्वाती अभय योजनेअंतर्गत**
**मोफत एस.टी पासची सवलत मिळणेबाबत**

**(४२) ३५५२९ (१३-०१-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दुष्काळग्रस्त मराठवाड्यातील ८ जिल्हयातील विद्यार्थ्यांना स्वाती अभय योजनेंतर्गत मोफत एस.टी पास सवलत योजनेस मंजुरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील इतरही दुष्काळग्रस्त भागातील ५० पैशाच्या आत पैशेवारी असलेल्या भागातील विद्यार्थ्यांना सरसकट स्वाती अभय योजना मोफत एस.टी. पास योजना लागू करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केलली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२७-०९-२०१६)** :(१), (२) व (३) लातूर जिल्हयातील विद्यार्थीनीने केलेली आत्महत्येची घटना लक्षात घेऊन मराठवाडा विभागातील विद्यार्थ्यांना सन २०१५-१६ च्या उर्वरित सत्राकरिता शिक्षणासाठी मोफत प्रवास सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतचा निर्णय राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर घेण्यात आला आहे. सदरची योजना सन २०१५-१६ या शैक्षणिक सत्राच्या उर्वरित सत्राकरिता लागू करण्यात आली होती. तसेच सन २०१५-१६ या शैक्षणिक सत्राचा कालावधी समाप्त झालेला आहे. प्रवास सवलत योजना राबविण्याबाबत शासनस्तरावर धोरणात्मक बदल होऊन त्याप्रमाणे दिनांक २५.०२.२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्यानुसार सर्व सवलत योजनांचा आढावा घेण्याबाबत दिनांक ०३.०५.२०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर समिती गठीत करण्यात आलेली असून सदर समितीच्या अधिनस्त सर्व सवलत योजनांचा आढावा घेण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परांडा, भूम (ता.वाशी, जि.उस्मानाबाद) मध्ये ४ वर्षे सतत दुष्काळ असल्याबाबत**

**(४३) ३५७६६ (१२-०१-२०१६). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परांडा, भूम (ता.वाशी, जि.उस्मानाबाद) मध्ये गेली ४ वर्षे सतत दुष्काळ पडत असून सरासरी पेक्षा पर्जन्यमान खूप कमी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्काळावर मात करण्यासाठी शासनाने आजपर्यंत कायमस्वरुपी अशी कोणती व्यवस्था केली आहे,

(३) असल्यास, दुष्काळावर मात करण्यासाठी किंवा दुष्काळग्रस्त सर्व जनतेला मदत करण्यासाठी
शासनाने कायमस्वरुपी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६)** :(१) अंशतः खरे आहे.
(२) व (३) राज्य शासनामार्फत दुष्काळावर मात करण्यासाठी उस्मानाबाद जिल्हयात जलयुक्त शिवार अभियान तसेच इतर विविध योजना राबविण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भात ५० च्या वर शेतक-यांनी आत्महत्या केल्यामुळे त्यांच्या वारसदारांना आर्थिक मदत मिळण्याबाबत**

**(४४) ३५८४३ (१३-०१-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सततच्या नापिकीमूळे व कर्जबाजारीपणामुळे तसेच यंदाचा खरीप हंगाम धोक्यात आल्यामुळे माहे ऑगष्ट २०१५ ते नोव्हेंबर २०१५ या कालावधीत विदर्भातील जवळपास ५० शेतकऱ्यांनी आत्महत्या केले असल्याची माहिती दिनांक १ नोव्हेबर २०१५ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भामध्ये आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या वारसदारांना अद्यापही सनाकडून आर्थीक मदत मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भामध्ये आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या वारसदारांना अधापही सनाकडून आर्थीक मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, विदर्भामध्ये होत असलेल्या शेतक-यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे काय वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही. आत्महत्या केलेल्या पात्र शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७ दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये रुपये १,००,०००/- इतकी मदत देण्यात आली आहे.

(४) शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यात बळीराजा चेतना अभियान, अकोला जिल्ह्यात जिल्हा प्रशासनाकडून मिशन दिलासा, वाशिम जिल्ह्यात जिल्हा प्रशासनाकडून मिशन प्ररणा, अन्नदाता प्रभोधन संकल्प सभा या प्रकारच्या विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. तसेच प्रत्येक तालुक्यामध्ये ग्राम स्तरीय समिती गठीत करण्यात आली असून त्यांचे मार्फत शेतकऱ्यांचे प्रबोधन करुन शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शहापूर तालुक्यात (जि.ठाणे) येथे वादळी पावसाने आदिवासी जनतेच्या घरांचे झालेले नुकसान**

**(४५) ३५८९० (१६-०१-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर तालुक्यात (जि.ठाणे) सतत तीन वर्षे झालेल्या वादळी पावसाने अनेक आदिवासी जनतेच्या व इतर जनतेच्या घरांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पंचनामे होवून सुध्द त्यंना शासनामार्फत कोणतीच नुकसान भरपाई अद्याप देण्यात आली नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०९-२०१६)** :(१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही. मागील चार वर्षात वादळी पावसाने नुकसान झालेल्या घरांसाठी शासन निर्णयाप्रमाणे मदत देण्यात आलेली आहे. तसेच सन २०१४-१५ मध्ये नुकसान झालेल्या ७३४ घरांसाठी मदत देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मानोरा (जि.वाशिम) येथे झालेल्या गारपीठामुळे मोठ्या प्रमाणात पिकाचे नुकसान होवूनही अद्यापपर्यंत नुकसान भरपाई मिळाल्या नसल्याबाबत**

**(४६) ३६१५८ (१६-०१-२०१६). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मानोरा (जि.वाशिम) येथे दिनांक ९ मार्च, २०१५ रोजी झालेल्या गारपीठामुळे तालुक्यातील पिंपरी, कोलाट, हळदा, आदि भागात मोठ्या प्रमाणात पिकाचे नुकसान होऊन अद्यापपर्यंत नुकसान भरपाई मिळाल्या नसल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी वाशिम यांच्याकडे दिनांक १९ जुलै, २०१५ रोजी एका निवेदनाद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नुकसान भरपाई देणे बाबत जिल्हा प्रशासनाद्वारे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-१०-२०१६)** :(१) होय.
(२) व (३) दिनांक ९ मार्च, २०१५ रोजीच्या गारपीटमुळे पिंपरी, कोलार, हळदा येथे ५० टक्केपेक्षा कमी नुकसान असल्याने मदत अनुज्ञेय नाही. अर्जदार शेतकऱ्यांनी केलेल्या निवेदनानुसार तहसिलदार, मानोरा, (जि.वाशिम) यांनी संबंधितांच्या शेतात पाहणी केली असता रब्बी पिक असल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे सदर शेतकऱ्यांना मदत देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**झाकलवाडी (ता.जि.वाशिम) येथील गट क्र.१३६ मधील ५.१२ हेक्टर आर जमीन संपादन करण्याचा प्रस्ताव**

**(४७) ३६१८५ (१६-०१-२०१६). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) झाकलवाडी (ता.जि.वाशिम) येथील गट क्र.१३६ मधील ५.१२ हेक्टर आर जमीन संपादन करण्याचा प्रस्ताव शासनामार्फत तयार करण्यात आला होता तथापि अद्यापपर्यंत सदर संपादनाची प्रक्रिया न झाल्यामुळे सन २००७ पासून सुमारे ४६ व्यक्तींच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव तयार असून सुध्दा नियोजित जागा हस्तांतरणाअभावी त्यांचे पुनर्वसन होत नसल्याची बाब

श्री.संजय वैरागडे व इतरांनी दिनांक २३ सप्टेंबर, २०१५ रोजीवा त्यासुमारास एका निवेदनाद्वारे जिल्हा प्रशासन व राज्य शासनाकडे त्यांचे पुनर्वसन करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनानुसार जिल्हा प्रशासन व राज्य शासनाने पुनर्वसन करण्याबाबत तसेच पुनर्वसन कार्यावाहीमध्ये विलंब करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-१०-२०१६)** :(१) होय. दिनांक २१/०९/२०१५ रोजी निवेदन दिले आहे.
(२) व (३) सदरहू प्रकल्पाच्या महत्तम पातळीमध्ये गावठाण बाधीत होत नाही. तथापि प्रकल्पाची महत्तम पूरपातळी + २० मी. या पातळीमध्ये मौजे झाकलवाडी येथील एकूण २२० घरांपैकी ४६ घरामध्ये काही प्रमाणात ओलावा होत असल्याचे दिसून येते. सदर धरण पूर्ण होऊन १९ वर्षे पूर्ण झालेली आहेत. आतापर्यंत गावठाणामध्ये कधीच पाणी आलेले नाही. त्यामुळे पुनर्वसनाऐवजी संरक्षक बांध जलरोधी खंदक (C.O.T.) करुन दिल्यास हा प्रश्न राहणार नाही. संरक्षक माती बांधाचे कामास मान्यता देण्यात आली असून माती बांधाचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर ४६ कुटूंबांची अडचण संपुष्टात येईल. त्यामुळे पुनर्वसनाची आवश्यकता नाही.

---

**कोलगाव (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथील शेतजमीनीचे वेकोली ओपनकास्ट माईन च्या डंपिंग यार्ड मुळे मोठे नुकसान होणार असल्याबाबत**

**(४८) ३६६६१ (१८-०१-२०१६). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोलगाव (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथील २४१.०० हे.आर.शेतजमीन अधिग्रहण प्रक्रिया माहे जुलै, २०१४ पासून वे.को.ली. प्रशासनाकडून करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित शेतजमीनीचे वेकोली ओपनकास्ट माईन च्या डंपिंग यार्ड मुळे मोठे नुकसान होणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गाव पुरग्रस्त असून वे.को.ली. मुळे पुन्हा कृत्रीम पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने उर्वरित जमिनीचे अधिग्रहण करुन गावांचे पुनर्वसन करण्याची मागणी शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या आपत्तीग्रस्त शेतकरी व गावक-यांची वे.को.ली. प्रशासन किंवा शासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात येत आहे वा येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-१०-२०१६)** :(१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे. भविष्यास प्रश्न उद्भवू शकतो.

(३) होय.

स्थानिक लोकप्रतिनिधी व गावकऱ्यांनी मा. केंद्रिय मंत्री व वेकोलीच्या अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केलेले आहे.

(४) वेकोलीद्वारा संबंधित निवेदनावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजा सावंग घाटंजी, (जि.यवतमाळ) पुरग्रस्तांना न्याय मिळणेबाबत**

**(४९) ३७०७१ (१६-०१-२०१६). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा सावंग घाटंजी, (जि.यवतमाळ) येथे सन २००५ मध्ये अतिवृष्टीने अनेक कुटूंबे प्रभावित झाल्याने सदर पुरग्रस्तांना न्याय मिळणे हेतू तहसिलदार (घाटंजी) यांना सन २००२ मध्ये शासन स्तरावरून कार्यवाही होणे करिता पत्रव्यवहार केला, हे खरे आहे काय,

(२) तसेच संबंधीतांना तात्पुरत्या व्यवस्थेसाठी जी जमीन देऊ केली होती त्या जमीनीस अद्यापही मान्यता देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाधितांना न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०९-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) पुरग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत सर्वंकष धोरण ठरविण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजा भिमकुंड (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथील वैनगंगा नदीच्या काठावर वास्तव्यास ११२ कुटूंबे पुर्णत: बाधीत असल्याबाबत**

**(५०) ३७०७६ (१८-०१-२०१६). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा भिमकुंड (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथील वैनगंगा नदीच्या काठावर वास्तव्यास ११२ कुटूंबे पुर्णत: बाधीत होऊन उद्धस्त झालेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) सदर कुटूंबाच्या पुनर्वसनासाठी मौजा भिमकुड बाधीत कुटूंबांनी शासकीय जमीन ई.वर्ग क्षेत्रफळ २२ हेक्टर ४१ आर पैकी २ हेक्टर ४० आर जमीन वास्तव्यासाठी मिळणेबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय तसेच शासनाने या ई वर्ग जमीनीच्या निवासासाठीच्या योग्यते अयोग्यते बाबतचा अहवाल नगर रचनाकार, आरोग्य अधिकारी, पाटबंधारे विभाग यवतमाळ घाटंजी, सा.बा. उपविभाग घाटंजी यांचे अभिप्राय मागविले आहेत, हे खरे आहे काय,

(३) त्याबाबत वरील नमुद केलेल्या सर्व विभागातील संबंधीतांनी शासनास अहवाल सादर केला आहे काय,
(४) असल्यास, मौजा भिमकुड बाधीत कुटूंबांनी शासकीय जमीन वास्तव्यासाठी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०९-२०१६)** :(१) होय.
(२) होय.
(३) व (४) पुरग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत सर्वकष धोरण ठरविण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.